



दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २६४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.०६ मे २०२५


## थोडक्यात

### धक्कादायक ! भाजप कार्यकर्त्याची झाडाला बांधलेली बॉडी आढळली



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, बुलडाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद येथून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. भाजप नेते आणि माजी मंत्री व आम दार संजय कुटे यांच्या गाडीवर चालक म्हणून काम करणाऱ्याची बॉडी सापडली आहे. संजय कुटे यांचे पूर्वी असलेले वाहन चालक पंकज उत्तमराव देशमुख वय वर्ष ४५ हे ३ मे रोजी सायंकाळच्या दरम्यान बराणपुर मार्गावरील त्यांच्या शेतात एका झाडालाच गळफास घेतल्याच्या अवस्थेत मृतदेह आढळल्यानंतर एकच खळबळ उडाली. पंकज यांची हत्या की आत्महत्या हे मात्र अद्याप गुलदस्त्यात आहे. कारण शरीरावर असलेल्या रक्तांच्या खुणा बघता त्यांची आत्महत्या की हत्या आहे अशी चर्चा लोकांमध्ये दिसून येत आहे. परंतु छवविच्छेदन फॉरेन्सिक अहवाल यावरून नेमकं या घटनेचे गुढ उकलणार आहे.

शनिवारी सायंकाळच्या दरम्यान बराणपुर रस्त्यालगत वायाळ गडी जवळ त्यांच्या शेतात झाडाला त्यांचा मृतदेह लटकलेला अवस्थेत दिसून आला. ठाणेदार श्रीकांत निचळ आणि पोलीस त्या ठिकाणी पोचले. आमदार संजय कुटे आणि त्यांचे कार्यकर्ते सुद्धा त्याच वेळी त्या ठिकाणी पोचले, त्यानंतर त्यांची उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. तेथून अकोला येथे फॉरेन्सिक लॅब मध्ये पाठविण्यात आले.

पंकज देशमुख हे भाजपचे कार्यकर्ते असून कंट्रकदार कामे देखील करत असत. सदा हसमुख आणि सर्वांशी मनमिळा म्हणून त्यांची ओळख होती. पंकज यांच्या पश्चात पत्नी मुलगा, मुलगी आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे. या घटनेची फिर्याद अनंता मधुकरराव देशमुख यांनी जळगाव जामोद पोलीस स्टेशनला दिली यावरून पोलिसांनी २१ /२०२५ कलम १९४ बीएनएस नुसार मर्ग दाखल केला पुढील तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय घट्टे हे करीत आहेत. एकंदरीत अहवालात गळफास घेऊन मृत्यू अशी प्राथमिक अहवालात माहिती पोलीस निरीक्षक श्रीकांत निचळ यांनी दिली. मात्र आत्महत्येचे कारण कारण मात्र अजूनही अस्पष्टच असल्याने परिसरात अनेक तर्क वितर्क लावले जात आहेत.

### हळदीच्या कार्यक्रमात बैल उधळला !



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०५, पडले (डोंबिवली) :** ठाणे रायगड जिल्ह्यात हळदीच्या कार्यक्रमात एक नवा ट्रेंड आलाय. हळदीच्या कार्यक्रमात खिल्लार बैल नाचविण्याची नवी प्रथा सुरू झालीय. या प्रथेमुळे अपघातांच्या घटना घडू लागल्या आहेत. रविवारी कल्याण शिळं रोड वरील पडले गावात पाटील कुटुंबियांच्या घरी हळदीचा कार्यक्रम होता. पाहुणे मंडळी आणि कुटुंबीय नाचण्यात दंग होते. दरम्यान हळदीत तरुणांनी बैल नाचवायला आणला, त्याच्यासमोर पैशांची उधळण देखील सुरू केली होती. मात्र राग आलेल्या बैलाने नाचणाऱ्यांना तुडवत आपली वाट मोकळी केली आहे. या प्रकाराची व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. या सुरू असलेल्या प्रकारांवर मात्र समाजातून टीकेची झोड सुरू झाली आहे. बैल नाचायला पैसे उधळायला आहेत की शेतीच्या कामासाठी असा प्रश्न सध्या उपस्थित केला जात आहे. अशा प्रथा निर्माण करून नागरिक कोणता आदर्श निर्माण करत आहेत? असा प्रश्न देखील उपस्थित झाला आहे.

# विदर्भात अवकाळी पावसाचा तडाखा ! २ बळी

## गारपिटीने विजेची तार पडल्यामुळे तडफडून मृत्यू



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०५, चंद्रपूर :**

विदर्भात सध्या अवकाळी पावसाने एकच हाहा:कार माजवला आहे. विदर्भाला अवकाळी पावसाने अक्षरश: झोडपून काढलं. यावेळी विदर्भातील अनेक भागात जोरदार पावसासह गाराही पडल्या. या गारपिटीमुळे चंद्रपुरात दोघांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

चंद्रपुरातील आकाशवाणीपासून जगन्नाथ बाबानगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर तुटून पडलेल्या विजेच्या जिवंत तारेला स्पर्श झाल्याने एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली. मृताचे नाव प्रभाकर गणपत क्षीरसागर असून ते दाताळा येथील रहिवासी आहे.

चंद्रपूर शहरातील जगन्नाथ बाबानगर येथील ए ६५ क्रमांकाच्या खांबावरून ११ केव्ही विजेची तार जाते. रविवारी (४ मे) संध्याकाळी आलेल्या पावसामुळे ही तार तुटून रस्त्यावर पडली. काही स्थानिक नागरिकांनी विज वितरण कंपनीला याची तातडीने ऑनलाईन तक्रार केली. मात्र, महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी विज पुरवठा बंद केला नाही. तसचे, पडलेली तार सुद्धा उचलली नाही. यादरम्यान, रस्त्याने जात असताना सायकलच्या चाकात विजेची तार अडकून ते पडले आणि तारेला स्पर्श झाला. ११ केव्हीच्या तारेला स्पर्श झाल्याने क्षीरसागर यांचा जागीच मृत्यू झाला.

ही घटना घडल्यानंतर दाताळा आणि जगन्नाथनगरमधील रहिवाशांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. नुकसान भरपाईचे लेखी आश्वासन दिल्याशिवाय मृतदेह उचलू देणार नाही, अशी भूमिका उपस्थित नागरिक व मृतांच्या कुटुंबीयांनी घेतली. अखेर विज वितरण कंपनीचे कनिष्ठ अभियंता पाटील यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर मृतदेह सामान्य रुग्णालयात हलविण्यात आला.

दरम्यान, विज वितरण कंपनीला ऑनलाईन तक्रार करूनही एक ते दीड तासापर्यंत ११ केव्हीची तार ही वर्दळीच्या रस्त्यावर पडलेली होती. विजेची तार उचलण्यास व विज पुरवठा बंद करण्यास विज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी-कर्मचाऱ्यांनी अक्षम्य विलंब केला. विज वितरण कंपनीच्या चुकीमुळे एका निष्पाप नागरिकाच्या नाहक बळी गेला. कमावता व्यक्ती गेल्याने क्षीरसागर कुटुंब उघड्यावर पडले. यासाठी विज वितरण कंपनीचे अधिकारी आणि कर्मचारी सर्वस्वी जबाबदार असून त्यांच्यावर सदोष मनुष्यबदाचा गुन्हा दाखल करावा, तसेच मृतकाच्या कुटुंबीयांना ५० लक्ष रुपयाची नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

**विज पडून मेंढपाळाचा मृत्यू**

चिमूर तालुक्यातल्या हिवरा येथे विज पडून एका मेंढपाळाचा मृत्यू झाला आहे, विकास ढोरे (४५) असं मृत मेंढपाळाचे नाव आहे. शेतात मेंढ्या चराई करत असताना रविवारच्या संध्याकाळी विज पडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. यासह शेतातील पिकांचंही नुकसान झालं आहे.

# जिल्ह्यातील मंजूर घरकुल लाभार्थ्यांसाठी रेती उपलब्धतेचे नियोजन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** घरकुल योजनेंतर्गत मंजूर लाभार्थ्यांना आवश्यक त्या प्रम णात आणि वेळेत रेती उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन भवन सभागृहात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेत महत्वपूर्ण आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले.

जिल्ह्यातील मंजूर घरकुल लाभार्थ्यांना आवश्यक रेती उपलब्ध करून देणे हा महाराष्ट्राचा यक्षप्रश्न असून, त्याच्या सोडवणुकीसाठी प्रभावी नियोजनाची अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले. मंजूर घरकुल लाभार्थ्यांना रेती उपलब्ध करून देण्याबाबत नियोजन भवन सभागृह येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा, उपविभागीय अधिकारी संजय पवार (चंद्रपूर), रवींद्र माने(राजुरा), अजय चरडे(मुल), जिल्हा खनिकर्म अधिकारी, चंद्रपूरचे तहसीलदार विजय पवार, तहसीलदार(मुल) मृदुला मोरे, तहसीलदार( बल्लारपूर) रेणुका कोकाटे, तहसीलदार (पोम्भुर्णा) रेखा वाणी, मनपा अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, मुलचे मुख्याधिकारी संदीप दोडे, बल्लारपूरचे मुख्याधिकारी विशाल वाघ, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रदीप बाराहाते तसेच मतदारसंघातील सर्व तालुका कृषी अधिकारी तसेच गट विकास अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

आ. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, 'घरकुलधारकांना वेळेत रेती न मि ळाल्याने प्रचंड असंतोष पसरला असून, येत्या आठ दिवसांत रेतीसंबंधी निर्णय घेणे आवश्यक आहे. विशेषतः मुल तालुक्यातील पाच महसूल मंडळांतील रेती घाटांमध्ये सध्या ८ हजार ब्रास



रेतीसाठा उपलब्ध आहे, तर एकूण २५ हजार ब्रास रेतीची आवश्यकता आहे. पोंभुर्णा तालुक्यात एकूण १९,६०० ब्रास रेतीसाठा असून, बल्लारपूरमध्ये मात्र १८,४६५ ब्रास मागणी असताना केवळ २६० ब्रास रेती उपलब्ध आहे.

जिल्ह्यातील सर्व रेती घाट १० जूननंतर बंद होणार असल्याने उर्वरित एक महिन्याच्या कालावधीत योग्य नियोजन करणे गरजेचे आहे.' गट विकास अधिकारी यांनी प्रत्येक मंजूर घरकुलासाठी आवश्यक रेतीची मागणी तहसिलदार यांचे कडे नोंदवावी. तसेच नदी, नाले व घाटांची पाहणी करून शक्य तेवढी रेती तहसिलदार यांनी उपलब्ध करून द्यावी. कोणत्याही गरीब घरकुल लाभार्थ्यांचे नुकसान होणार नाही याची विशेष काळजी घ्यावी, असे निर्देश आ. मुनगंटीवार यांनी दिले. पुढील टप्प्यात महसूल मंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या समवेत झूम बैठकीचे आयोजन करण्यात येईल. घरकुल लाभार्थ्यांना वेळेत व नियमानुसार रेती मिळावी यासाठी प्रशासनाने समन्वय साधून काम करावे, अशी अपेक्षा यावेळी आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

# बारावीच्या परीक्षेचा निकाल ९१.८८ टक्के ! मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी मुलांपेक्षा जास्त

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०५, ठाणे :** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र १२वी परीक्षेत यश मिळविलेले विद्यार्थी, त्यांचे पालक आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी अभिनंदन केले आहे. त्याचबरोबर देशाचे भविष्य असलेल्या या विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीसाठी त्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१२ वी) परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल सोमवारी दि. ०५ मे २०२५ रोजी मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी आणि सचिव देविदास कुलाळ यांनी जाहीर केला.

शालेय शिक्षण मंत्री भुसे म्हणाले, बारावीची परीक्षा हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील एक महत्वाचा टप्पा आहे. या परीक्षेतील यशानंतर त्यांना आपल्या आवडीनुसार विविध क्षेत्रांमध्ये वाटचाल करण्याचा मार्ग खुला झाला आहे. या माध्यमातून स्वत:ची आणि पर्यायाने देशाची प्रगती साधण्याची संधी मिळणार असल्याने ते या संधीचे सोने करतील, असा विश्वास आहे. तथापि, ही परीक्षा हे अंतिम ध्येय नाही, यामुळे ज्या विद्यार्थ्यांना अपेक्षित यश मिळाले नाही त्यांनी नव्या उमेदीने अभ्यासाला लागावे आणि यश संपादन



करावे, असेही त्यांनी म्हटले आहे.

या परीक्षेत पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून विज्ञान, कला, वाणिज्य, व व्यवसाय अभ्यासक्रम व आयटीआय या शाखांसाठी एकूण १४,२७,०८५ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४,९७,९६९ विद्यार्थी प्रविष्ट झाले असून त्यापैकी १३,०२,८७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्णतेची ही टक्केवारी ९१.८८ आहे. सर्व विभागीय मंडळांमधून कोकण विभागाचा निकाल ९६.७४ टक्के इतका सर्वाधिक आहे.

**विभागीय मंडळनिहाय निकाल -**

कोकण विभागातील २२,७९७ (९६.७४ टक्के), कोल्हापूर विभागातील १,०६,००४ (९३.६४ टक्के), मुंबई विभागातील २,९१,९५५ (९२.९३ टक्के), छत्रपती संभाजीनगर १,६५,९६१ (९२.२४ टक्के), अमरावती १,३२,८१४ (९१.४३ टक्के), पुणे २,२१,६३१ (९१.३२ टक्के), नाशिक १,४४,१३६ (९१.३१ टक्के), नागपूर १,३६,८०५ (९०.५२ टक्के) आणि लातूर विभागातील ८०,७७० (८९.४६ टक्के) विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

सर्व विभागीय मंडळांतून ६,७६,९७२ मुले तर ६,२५,९०१ मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. नियमित मुलांची उत्तीर्णतेची टक्केवारी ८९.५१ टक्के असून मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी ९४.५८ टक्के आहे. म्हणजेच मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी मुलांपेक्षा ५.०७ टक्क्यांनी जास्त आहे. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी १,४९,९३२ विद्यार्थी प्रावीण्यासह प्रथम श्रेणीत, ४,०७,४३८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ५,८०,९०२ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर १,६४,६०१ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.

**शाखानिहाय उत्तीर्ण विद्यार्थी -**

विज्ञान शाखेतील ७,१५,५९५ विद्यार्थी (९७.३५ टक्के), कला शाखेतील २,८१,६०६ (८०.५२ टक्के), वाणिज्य शाखेतील २,७७,६२९ (९२.६८ टक्के), व्यवसाय अभ्यासक्रम २४,४५० (८३.२६ टक्के) तर आयटीआय मधील ३,५९३ (८२.०३ टक्के) विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उत्तीर्णतेचे प्रमाण ९२.३८ या परीक्षेस राज्यातील नऊ विभागीय मंडळांमधून सर्व शाखांमधून एकूण ७,३१० दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ७,२५८ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले. त्यापैकी ६,७९५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ही टक्केवारी ९२.३८ इतकी आहे.

**श्रेणीसुधार/ गुणसुधार योजना -**

या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची संपादणूक सुधारण्यासाठी श्रेणी / गुणसुधार योजनेअंतर्गत फक्त लगतच्या तीन परीक्षांमध्ये पुन:श्च परीक्षेस प्रविष्ट होता येईल. त्यानुसार फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या परीक्षेस प्रविष्ट होऊन सर्व विषयात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना (एकाच वेळी सर्व विषय घेऊन प्रविष्ट होणाऱ्या) जून-जुलै २०२५, फेब्रुवारी-मार्च २०२६ व जून-जुलै २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस श्रेणीसुधार/ गुणसुधार साठी प्रविष्ट होण्यास तीन संधी देण्यात येत आहेत, असे मंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

या परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांना अपेक्षित यश मिळाले नाही त्यांनी हताश न होता पुन्हा नव्या उमेदीने अभ्यासाला लागावे व यश संपादन करावे, असे आवाहन मंत्री भुसे यांनी केले आहे.

# संपादकीय



## भ्रष्टाचार थांबणार कधी?

भारत देश एकीकडे आर्थिक महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत आहे तर दुसऱ्या बाजूने भ्रष्टाचाराची कीड भारतीय व्यवस्थेला खिळखिळी करत आहे. आजमितीला गल्लीपासून दिल्लीपर्यंत भ्रष्टाचार बोकाळला आहे. प्रचंड स्वार्थ, आर्थिक हाव, असमाधानी वृत्ती आणि मुजोरी ही या भ्रष्टाचाऱ्यांची प्रमुख लक्षणे आहेत. 'सरकारी काम आणि सहा महिने थांब' अशी स्थिती आज प्रत्येक खात्याची झाली आहे. काम लवकर करून घ्यायचे असेल तर तुम्हाला टेबलाखालून पाकीट द्यावेच लगेच हा सरकारी खात्यांचा जणू अलिखित नियम बनला आहे. भ्रष्टाचारावर आळा बसण्यासाठी केंद्र सरकारने अनेक सरकारी व्यवहार डिजिटल केले आहेत; मात्र भ्रष्ट अधिकाऱ्यांनी त्यातूनही भ्रष्टाचाराच्या विविध वाटा शोधून काढल्या आहेत. आज देश मोठ्या युद्धाच्या तयारीत आहे त्यासोबत गृहयुद्ध भडकू नये याचीही सिद्धता करत आहे, तर दुसऱ्या बाजूने सरकारी अधिकारी भ्रष्टाचाराच्या धनातून आपल्या पुढच्या कित्येक पिढ्यांची सोय करत आहेत. इतरांच्या कष्टाचा पैसा ओरबाडून यांच्या पुढच्या पिढ्या खरोखर सुरक्षित जीवन जगणार आहेत का ? यंदाच्या वर्षात राज्यात उघड झालेल्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांचा अहवाल आला असून यंदा राज्याच्या महसूल खात्याने पोलीस खात्यालाही मागे टाकले आहे. १ जानेवारी ते ७ एप्रिल २०२५ या कालावधीत राज्यात २१२ प्रकरणांत सापळे रचून ३०८ सरकारी कर्मचारी आणि अधिकारी यांना अटक करण्यात आली आहे. ज्यामध्ये महसूल खात्याचे ५६ तर पोलीस खात्याचे ३१ कर्मचारी आणि अधिकारी आहेत. सर्वच सरकारी कार्यालयांत भ्रष्टाचार हाच शिष्टाचार असल्याने अन्य प्रकरणे ही अन्य सरकारी खात्यांच्या संदर्भातील आहेत ज्यामध्ये पंचायत समिती मधील २५, महावितरण खात्यातील मधील १२ , महापालिका प्रशासनातील १०, जिल्हा परिषदेतील १०, आरोग्य विभागातील १० आणि शिक्षण विभागातील ८ प्रकरणे उघडकीस आली आहेत . प्रत्येक सरकारी कार्यालयात 'लाच देणे आणि घेणे हा गुन्हा आहे' अशा स्वरूपाची पाटी लावलेली असते; मात्र या पाटीखालीच सर्वाधीक प्रमाणात लाच मागितली जाते आणि ती दिलीही जाते. लाच मागणाऱ्याच्या विरोधात तकार प्रविष्ट करण्याचे आवाहन लाच-लुचपत खात्याकडून वेळोवेळी केले जाते, त्यासाठी जागृतीही केली जाते ज्याचा परिणाम म्हणून लाच मागणाऱ्यांच्या विरोधात तक्रार करणाऱ्यांचे प्रमाण पूर्वीच्या तुलनेत नक्कीच वाढले आहे; तरीही आपली कामे लवकर करून घेण्यासाठी या भ्रष्टाचाऱ्यांची पोटे भरणाऱ्यांचीही या देशात कमी नाही. शहरांसारख्या प्रगतशील भागांत शासकीय अखत्यारीतील काही क्षेत्रांत ऑनलाईन अर्ज प्रक्रिया आणि डिजिटलायझेशन यांमुळे सामान्य जनतेचा सरकारी अधिकाऱ्यांशी थेट संपर्क येत नसल्यामुळे भ्रष्टाचारावर काही अंशी अंकुश आला असला, तरी ग्रामीण भागातील अशिक्षित जनतेची भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून लहान सहान कामांत सर्रासपणे लुबाडणूक सुरु आहे. कर्तव्यभावनेला तिलांजली देऊन जडलेल्या भ्रष्टाचाराच्या सवयीमुळे सरकारी कर्मचारी आणि अधिकारी यांमध्ये काम टाळण्याची वृत्ती निर्माण होत आहे. सामान्य नागरिकांच्या मासिक वेतनातून कररूपाने सरकार दरबारी जाणाऱ्या पैशातून ही सरकारी मंडळी गलेलठ्ठ वेतन घेत असतात. तरीही यांची भूक भागत नाही म्हणून त्याच अन्नदात्याच्या असहायतेचा गैरफायदा घेऊन त्याला लुबाडतात. शिपायापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचाराची एकसंध साखळी असल्याने खालचा अधिकारी कामाचे पैसे मागतो म्हणून वरच्या अधिकाऱ्याकडे तक्रारही करता येत नाही. सरळमार्गाने काम करून घायचे असेल, तर त्यासाठी सरकार दरबारी अनेकदा चकरा माराव्या लागतात. पुन्हा पुन्हा कामाचे खाडे नकोत म्हणून सामान्य नागरिक अधिकाऱ्याच्या मागणीप्रमाणे पैसे देतो आणि आपला वेळ वाचवतो, अशा प्रकारची ही प्रक्रिया सरकारी कार्यालयांत अविरतपणे सुरु असते. सामान्य नागरिक वेळ आणि कार्यालयाच्या सुट्या वाचवण्यासाठी भ्रष्टाचाराला खतपाणी घालत असतो. अर्थात या भ्रष्ट क्षेत्रामध्येही काही कर्तव्यनिष्ठ आणि कार्यतत्पर अधिकारी असतात; मात्र यांची संख्या तुलनेने कमी असल्याने सरकारी कार्यालयांत भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे. मासिक वेतनाव्यतिरीक्त अधिक पैसे मिळावेत, कमी मालाच्या मोबदल्यात जास्त नफा मिळावा यासाठी सामान्य व्यक्तीला लुबाडणे, त्याची फसवणूक करणे, त्याच्यावर दबाव आणणे, त्याला परावृत्त करणे यांसारखे सर्व प्रकार भ्रष्टाचारामुळे घडतात आणि यामागे दडलेला असतो तो कमालीचा स्वार्थ तो साधण्यासाठी इतरांचे कितीही नुकसान झाले तरी चालेल पण माझा स्वार्थ साधला जायला हवा ही असुरी वृत्ती, झटपट श्रीमंत होण्याची असूया आणि माझे कोणी वाकडे करू शकणार नाही ही मुजोरी. भ्रष्टाचारासाठी दिलेला पैसा हा सामान्य माणसाच्या मेहनतीचा आणि प्रामाणिकपणे काम केल्याचा मोबदला असतो. इच्छा नसतानाही तो इतरांना बहाल करताना त्यामागे त्याचा तळतळाटसुद्धा असतो त्यामुळे भ्रष्टाचाऱ्याच्या तो कितपत पचनी पडणार ? अध्यात्मशास्त्रानुसार वैयक्तिक स्वार्थासाठी गैरमार्गाने इतरांकडून धन लुबाडणे हे फार मोठे पाप असून त्याच्या फळस्वरूपात लुबाडणाऱ्याची या नाहीतर पुढील जन्मात निश्चितपणे कित्येक पटीने हानी होते.

# लोककल्याणकारी राजा ; राजर्षी छत्रपती शाहू महाराज !

आज ६ मे, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १०३ वि पुण्यतिथी. आजच्याच दिवशी १९२२ रोजी त्यांचे निधन झाले. २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते.

कोल्हापूर (करवीर) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतूम बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना



शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. शाहू महाराजांच्या या निर्णयाला तेंव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अंमलबजावणी केली. शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला. १९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले. त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. चित्रकला, लोककला, संगीत, साहित्य, नाट्य, कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मिळवून दिला. शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे. बाबासाहेब मॅट्रिकमध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. २० आणि २१ मार्च १९२० रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले पण आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद करावे लागले जेंव्हा हे शाहू महाराजांना समजले तेंव्हा त्यांनी २५०० रुपयांची आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे. व्यापक दूरदृष्टीच्या या राजाने त्याकाळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव, दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य या क्षेत्रांमध्ये जे कार्य केले आहे तसे कार्य आजवर कोणीही केले नाही. त्यांचे कार्य आजच्या आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे. आज त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एकप्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. **पुण्यतिथीदिनी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन!**

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# पनवेल महानगरपालिकेत लोकशाही दिन संपन्न

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०५, पनवेल :** सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज दिनांक ५ मे रोजी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये 'लोकशाही दिनाचे' आयोजन करण्यात आले होते. या लोकशाही दिनी सात अर्ज प्राप्त झाले.

नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवादवाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे



आयोजन करण्यात येते.त्यानुसार आज झालेल्या लोकशाही दिनी नागरी सेवा सुविधा बाबत समस्या सोडविण्यात आल्या. प्राप्त झालेल्या सातही अर्जांचे तात्काळ निराकरण करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. या वेळी परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त सर्वश्री डॉ.वैभव विधाते, रविकिरण घोडके, प्रसेनजित कारलेकर, स्वरूप खारगे, शहर अभियंता संजय कटेकर, आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर , सामान्य प्रशासन विभाग प्रमुख अमर पाटील , अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मागील लोकशाही दिन पर्यंत प्राप्त झालेल्या १० तक्रारीचे निवारण झाले असून शिल्लक तक्रारींची संख्या निरंक आहे.

## युध्द वेळ..

काही नेते मंडळींना
युध्दाची झाली घाई
वाटे कसा पोरखेळ
संकटात देशास नेई

सर्वकष हवी तयारी
करण्याआधी लढाई
आंधळ्याद्वेषत्वेषात
नको उन्मादी बढाई

निसर्गाची साथसंगत
योजनांबध्द रे घडाई
भौगोलिक स्थितीची
काळजीपूर्वक पढाई

शस्त्रास्त्रेपारजून ठेवे
मगच सु योग्य चढाई
सैनिकीमनोबलवृध्दी
निर्णय नकोआतताई


अन्यदेश हवेत सोबत
संबंधात नाही खटाई
मित्र मंडळी साथीदार
संकल्पा नको ढिलाई

भडकाउडता युध्दाचा
गगना भिडेलमहागाई
आवश्यकतजवीजीने
व्यवस्था पूर्वक सगाई

सुयोग्यवेळ महत्वाची
जगत् हे देईलं बधाई
विजयश्री स्वता येईलं
वाजवी मधूर शहनाई

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

## पुस्तकांचे वाचन वाढवा....



पुस्तकांचे वाचन फार कमी झाले आहे...
व्यसनाचे प्रमाण फोफावले आहे....
जमाना खूप चंगळवादी झाला आहे....

पुस्तकांच्या वाचनाने माणूस माणसात येतो...
वाईट व्यसनाने माणूस माणसातून उठतो...
इज्जतीचा पार कचरा करून घेतो....

वाचनाने माणूस ज्ञानवंत व प्रज्ञावंत होतो....
अन्यायाविरुद्ध प्रहार करायला शिकतो...
लेखनातून भाषणातून सामाजिक समस्या मांडतो...

वाचनाने माणसाची बुद्धी प्रगल्भ होते...
विचार करण्याची क्षमता वेगवान होते...
मनातील घाण साफ होऊन मन शुद्ध होते....

पण लोकांना वाचनाचे महत्त्व केव्हा कळणार...?
वाचनालयाकडे मन त्यांचे कधी वळणार...?
मोबाईलच्या युगात तेवढी समज त्यांना कधी येणार...?

त्यासाठी आई-वडिलांचा जीवन संघर्ष आठवावा लागेल...
महापुरुषांचा जीवन लढा ज्ञात करावा लागेल...
शिक्षणाचे महत्त्व जाणून घ्यावे लागेल...

म्हणून पुस्तकांचे वाचन खूप खूप वाढवा...
वैचारिक पातळी तल्लख व मजबूत ठेवा...
फुले शाहू आंबेडकरांना आदर्श स्थानी ठेवा...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# जी एस महानगर बँकेची रणधुमाळी...



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०५, सुपा (अहिल्यानगर) :** जी एस महानगर बँकेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक जाहीर झाली असून बँकेच्या अध्यक्षा सुमनताई गुलाबराव शेळके यांच्या नेतृत्वाखाली संस्थापक अध्यक्ष सॉलिसीटर गुलाबराव शेळके साहेब व श्रीमती सुमन गुलाबराव शेळके पॅनल उभा करण्यात आला आहे अशी माहिती बँकेच्या अध्यक्षा सुमनताई गुलाबराव शेळके यांनी दिली आहे. जी एस महानगर बँकेचा १९७३ साली सुरू झालेला हा प्रवास एका छोट्याशा ९ बाय १८ चौरस फूट खोलीतून झाला. परंतु ही केवळ बँकेची कहाणी नाही, ही आहे एका स्वप्नाची कथा, जी माझे पती सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब आणि त्यांचे सहकारी यांनी प्रत्यक्षात आणली.

आज जी एस महानगर बँक संपूर्ण महाराष्ट्रभर विस्तारली आहे. बँकेचे ८० हजार ४१० भागधारकांचा बँकेवर ठाम विश्वास असून ६८ कोटी ६१ भाग भांडवल आहे. २ हजार ८८४ कोटींची भक्कम ठेव असून राज्यभर ७० शाखांचा विस्तार झालेला आहे.जी एस महानगर बँकेचे हे यश विश्वासाचं, जिद्दीचं आणि सामूहिक प्रगतीचं प्रतीक आहे. आपली बँक ही, फक्त बँक नाही, तर लोकांसाठी, लोकांनी उभी केलेली चळवळ आहे. जी एस महानगर बँकेच्या भवितव्यासाठी, दिवंगत गुलाबराव शेळके व ॲड उदय शेळके यांच्या स्वप्नांची पुर्ती म्हणजे त्यांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली च होय, संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके व सुमन गुलाबराव शेळके पॅनलच्या विचारांना पाठिंबा द्यावा, जीएस महानगर बँकेचे सर्व ग्राहक, हितचिंतक आणि ठेवीदारांमुळे हे शक्य झाले आहे. त्यामुळे मी त्यांचे मनः पूर्वक आभार मानत असल्याचे, मत, बँकेच्या अध्यक्षा सुमनताई गुलाबराव शेळके यांनी व्यक्त केले आहे.

# माल वाहतूक टेम्पो पलटी ; जीवितहानी नाही

**अक्षराज : भाऊसाहेब पाटील**

**दि.०५, मानखुर्द (मुंबई) :** आज दि.५ मे रोजी सकाळी ८:२५ वाजता वाशी भाजी मार्केट वरून येणारा **MH O1CV 9343** भाजी माल वाहतूक टेम्पो, वीर जिजामाता भोसले मार्ग, घाटकोपर मानखुर्द जोड रस्ता म्हाडा कॉलनी येथे चालकाचे नियंत्रण सुटल्याने मालाच्या अवजड वजनाने पलटी होऊन अपघात झाल्याची घटना घडली आहे. त्यात एक महिला डोक्याला मार लागून गंभीर जखमी झाली, तिला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात

आले असून सदर महिलेवर उपचार सुरूर आहेत. आजूबाजूच्या प्रत्यक्षदर्शी नागरीकांनी यावेळी तात्काळ मदत केल्याने मोठी दुर्घटना टळली.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## ममता विद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०५, पालम (परभणी) :** पालम येथील बळीराजा शिक्षण संस्थेच्या ममता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालया ने बारावी परीक्षेच्या निकालात यशाची परंपरा कायम ठेवली आहे. सोमवार, दिनांक ०५ मे २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे, विभाग छत्रपती संभाजीनगरच्या वतीने मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला असून यामध्ये ममता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उज्वल यशाची परंपरा कायम ठेवत यश संपादन केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ बारावी परीक्षेसाठी तीन शाखेचे मिळून ३१९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. यामध्ये ३०८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, शाळेचा एकूण निकाल ९७ टक्के लागला आहे. यामध्ये विशेष प्राविण्यसह १५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये कला शाखेमध्ये काळे मुक्ता संजय ८१.३३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला आहे. सूर्यवंशी वैष्णवी कृष्णा ८०.३३ टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला आहे. पौळ चित्रा मारुती ७६.५० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला आहे. विज्ञान शाखेमध्ये लोखंडे तनुजा राजाराम ८१.३३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला आहे. पौळ राधा माधव ८०.५० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला आहे , फुलपगार प्रीती बालासाहेब ७७.८३ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला आहे.त्याचप्रमाणे वाणिज्य शाखेमध्ये पौळ आशांका गणेश ७२.८३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला आहे, मेकेवाड आरती राजू ७०.८३ टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला आहे. ढवळे दुर्गा माधवराव ६९ टक्के तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले आहे, तिन्ही ही शाखेमध्ये मुलींनी बाजी मारल्याचे दिसून येत आहे. सर्व बारावी परीक्षेत यश संपादन केलेल्या उतीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थापक लक्ष्मणराव गोळेगावकर, संस्थेचे अध्यक्ष तुषार गोळेगावकर, सचिव डॉ.स.गो.यलमोटे, ज्येष्ठ सदस्या चित्रा दुधाटे, प्रशासकीय अधिकारी गिरीष सोळंके, मुख्याध्यापक शिवाजीराव अंभोरे, शिक्षक व शिक्षकोत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## पंचशील उच्च माध्यमिक विद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के तर कला शाखेचा ८४ टक्के

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.०५, हदगाव (नांदेड) :** फेब्रुवारी २०२५ ला घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर झाला असून विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के तर कला शाखेचा निकाल ८४ टक्के लागला आहे. विज्ञान शाखेतून कु.हेंद्रे भारती विजय ७७.३३ टक्के, कदम रितेश सुनील ७४.८३ टक्के, कु.प्राजक्ता अजय पोंगाणे ७३.०० टक्के, धीरज अशोक पाईकराव ७२.०० टक्के गुण मिळवून अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय आले आहेत. तर कला शाखेतून कु.पवार दुर्गा देविदास ८०.५०, कु.गायकवाड पुजा पांडूरंग ७७.१७, कु.हरणे निकीता राजू ७६.१७, कु.पऊळ श्धदा अशोक ७५.१७ टक्के गुण मिळवून अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेत एकूण १६१ विद्यार्थी परीक्षेत बसले होते. सर्वच १६१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर कला शाखेत एकूण १७६ विद्यार्थी परीक्षेत बसले होते. १४७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव सुनील हरिहरराव सोनुले, उपाध्यक्षा कुमुद हदगावकर, कोषाध्यक्ष शिवाजीराव तावडे, संचालक वि.मा.टाले, जगदीश कदम,दा.बा. पवार, लक्ष्मीकांत लोणे मुख्याध्यापक बंड्रेवार, पर्यवेक्षक जाधव, दस्तूरकर,देशमुख,संदिप ढोले, काळबांडे, ओमकार मुधोळ, राजू तोष्णीवाल उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रा.पी. एल.देशमुख प्रा. व्ही.एस.खिसे. प्रा.राठोड, प्रा.पी.जी.पतंगे, पुरुषोत्तम धुळे आदींनी अभिनंदन केले आहे.

## टाकळी ढोकेश्वर येथे रंगलेल्या सप्ताहाची काल्याच्या किर्तनाने सांगता



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथे आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता श्रीकृष्णकृपांकित हभप विकासानंद महाराज मिसळ (पिंपळगाव वाघा) यांच्या काल्याचे किर्तनाने झाली. दत्त मंदिर प्रांगणात भक्तीमय वातावरणात पार पडलेल्या सात दिवसाच्या धार्मिक कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतील ग्रामस्थांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. ह.भ.प. विकासानंद महाराज म्हणाले की, आजच्या कलियुगात जीवनाच्या सुख, समाधानासाठी नामस्मरणाची गरज आहे. अहंकाराने मनुष्याची विनाशाकडे वाटचाल सुरु होते. अहंकार निर्माण झाल्याने त्याला चांगले, वाईट यामधील फरक समजत नाही. अहंकाराची जोडवे उतरविल्याने खरा परमार्थ साधला जात असल्याचे त्यांनी सांगितले. तर त्यांच्या श्रीकृष्ण चरित्र कथेत उपस्थित भाविक भक्तिरसात न्हाऊन निघाले. किर्तनाच्या समारोपनंतर विकासानंद महाराज यांचा उपस्थित ग्रामस्थांनी पुष्पहाराने सत्कार केला. सप्ताहाचे हे ५७ वर्ष होते. गावातील ग्रामस्थ या धार्मिक कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सप्ताहनिमित्त ७ दिवस पहाटे काकडा भजन, सकाळी ज्ञानेश्वरी पारायण, हरीपाठ व किर्तनाने गाव भक्तीरसात न्हाऊन निघाले. काल्याच्या कीर्तनाच्या समारोपानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. या सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायतीचे सरपंच व सर्व सदस्य, सोवा सोसायटीचे चेअरमन व संचालक, भजनी मंडळ व ग्रामस्थ तसेच दत्त सप्ताह कमेटी परिश्रम घेतले आहे.

## वीररत्न शिवा काशिद यांच्या जयंती उत्सवानिमित्त पूजन, अभिवादन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, बुलडाणा :** सोमवार, दिनांक ०५ मे २०२५ रोजी बुलडाणा शहरातील वीररत्न शिवा काशिद स्मारक येथे नगराध्यक्ष पूजा संजय गायकवाड यांच्या हस्ते नरवीर सुभेदार श्री शिवा काशिद यांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पूजन व अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पहेलगाम येथील भ्याड यशवंती हल्लूयामध्ये शहीद झालेल्या निष्पाप नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. विधानसभा मतदारसंघातून कोट्यवधी रुपयांचा निधी मिळून हे भव्यदिव्य स्मारक पूर्णत्वास गेले. यावेळी समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, तसेच समितीचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, समाजबांधव उपस्थित होते.

# बालपणीच्या त्या रम्य आठवणी : एक रंगीबेरंगी दुनिया

१ मे म्हणजे एकमेकांत असणारा मित्र, बंधूभाव वाढवणारा तो दिवस..! १ मे म्हणजे निकालाचा असणारा वर्षभराचा लेखाजोखा..! तेव्हाच खरं समजायचं की, वर्षभर आम्ही किती अभ्यास केलाय..? त्यावेळेस टक्केवारी सुद्धा ६० , ७० ,७५, इतकीच असायची. हल्ली वर्गात १०० पैकी १०० चे १० विद्यार्थी आहेतच. तरीही माहीत होतं, वर्गात आम्ही ५-६ जण थोडेसे अधिकचे हुशार होतो. त्यामुळे या सगळ्यांमधून पहिला , दुसरा, तिसरा कोण येणार हे मात्र ठरलेलं असायचं. असं असलं तरी प्रथम येण्याची घाई मात्र कुणालाच नसायची. असो.. त्यापेक्षाही निकाल घेतल्यानंतर वर्षभराच्या या ठरलेल्या नियोजित सुट्टीच्या दिवसांत काय काय खेळायचे, याची नियोजनबद्ध यादी तयार असायची. हल्ली शाळेची वेळ त्याअगोदर अर्धा तास उठणारे आम्ही, या सुट्टीच्या दिवसातही सकाळी लवकरच उठायचो. बऱ्याच वेळेस घरचे म्हणायचे, काय आहे एवढ्या लवकर..? उठून तरी कशीबशी कधी अंघोळ तर कधी तीही नसायची. पण ती घामाची अंघोळ प्रत्येकाची कधी होऊन जायची, हे कळायचंच नाही. कारण सकाळी गल्लीतील जमलेले आमचे स्नेही मित्र आणि त्यासोबत खेळणारे क्रिकेटचे खेळ..! अगदी दुपारच्या बारा वाजेपर्यंत आम्ही क्रिकेट खेळायचो. खेळत असताना कधी पोटाला सुट्टी भेटायची, हेसुद्धा कळत नसायचं.

पण त्या दुपारच्या उन्हाच्या चकचकीने आम्ही घरी परत यायचो. घरी आल्यानंतर लगेच अंग स्वच्छ झालं की जेवणासाठी बसायचो. पण जेवणातही लक्ष नसायचं. कधी जेवण फिनिश करून पुन्हा त्याच मित्रांना भेटू, याची उत्सुकता असायची.

मित्रांसोबत गप्पागोष्टी कराव्यात, असं मनोमन वाटायचं. पण उन्हाच्या त्रासामुळे घरचे बाहेर जाऊ देत नसायचे. हल्ली जवळच्या मित्राला खिडकीतून मारलेली हाक असेल किंवा भाऊ-बहीण यांच्यासोबत बसून खेळलेला, आष्टाचम्मा(आधुनिक लुडो), कॅरमचा खेळ असेल. विशेष सांगायचं झालं तर कॅरमच्या खेळामध्ये आम्ही व्यापारसुद्धा खेळायचो आणि या व्यापारामध्ये मी कधी लक्षाधीश झालो,



समजायचंसुद्धा नाही. हे फक्त आपल्या माहितीस्तव सांगतोय की लहानपणीच मी लक्षाधीश होतो पण असो, पुन्हा सायंकाळ झाली, बॅटची फळी एका हाताने खांद्यावर घेऊन जणू हनुमान देवांनी जसा गदा खांद्यावर घ्यावा, तसं आमची ही सेना तयार असायची. सेनापती कधी मी, तर कधी माझा मित्र. जोपर्यंत आकाशात उडवलेला चेंडू दिसणार नाही, तोपर्यंत आम्ही क्रिकेट सायंकाळी खेळायचो. जर रात्र झाली तर तर काहीसा वेळ लपंडाव असायचाच.! जणू पंतप्रधानाचा जसा दिनउपक्रम टाईट असावा तसा आमचा टाईट दिनउपक्रम होता.. काही दिवसांनी आमचे मित्र मामाच्या गावाला जायचे. त्यामुळे संघ जर तयार होत नसायचा. तेव्हा लगेच सायंकाळचा खेळ म्हणजे विटी दांडू, काचेच्या गोट्या, तोही मजेशीरच खेळ..! खूप मज्जा ,आनंद असायचा. जीवनामध्ये त्या दिवसांइतके आयुष्य आनंदी जगता येईल, असं आता वाटत नाही. कधी कधी आमच्या एका मित्राला शेतामध्ये असणारे आंबे दिसायचे. चोरून आंबे खाणे. शेतातल्या व्यक्तीने फेकून मारलेला तो चिखलाचा ढेकूळ आमच्या जवळ आला कि, ती पळण्याची असणारी मज्जा ती वेगळीच ! कुणाला झाडावर चढता येत होतं, तर कुणी दगडाने आंब्याला निशाणा बांधायचा. आंब्यापेक्षा ही माळावर फिरून झाडांची चारी चाकणे असेल, तीही मज्जा वेगळीच..! एक जरी आंबा मिळाला तर अंगावर असणारी अंगी किंवा मित्राच्या शर्टाने तोंडात धरून दोन तुकडे करून एकमेकांस वाटून देणे असो, एखादा मित्र हळूच आपल्या खिशातून मीठ आणि लाल मिरचीची मिश्रित केलेली पुडी असो. ते खाण्याचा आस्वादच वेगळा..!तहानभूक आम्ही पूर्णपणे विसरून जायचो. उन्हाचा प्रकाश म्हणजे खऱ्या अर्थाने चांदण्याचा प्रकाशच वाटायचा. आमच्यासाठी स्क्रीन टाईम म्हणजे एखादे डिझनी, कार्टून शक्तिमान, सिंबा, मोगली इतकेच असतील किंवा जास्तीत जास्त एखादी मालिका किंवा चित्रपट..! बरं झालं देवा, त्यावेळेस मोबाईल नव्हता. नाहीतर कदाचित संपूर्ण बालपण त्यातच हरवलं असतं.

आज मोबाईलचा प्रचार प्रसार पाहता, स्क्रीन टाईम पाहता मैदानी खेळला सुट्टीच झालेली दिसते. असो, गेले ते दिवस राहिल्या त्या समुद्रासारख्या आठवणी.

१ मे हा दिवस आमच्यासाठी एक खास दिवस होता. त्यावेळेस कुठलं फाउंडेशन वगैरे काही नव्हतंच. जूनमध्ये शाळेत जर प्रवेश मिळायचा असेल तर गुरुजी आम्हाला उजव्या हाताने डावा कान पकडता येत होतं का ? ही एक तपासणी आणि जणू परीक्षाच होती. जर कानाला हाताचा स्पर्श झाला तर प्रवेश निश्चित. अशा उन्हाळी सुट्ट्या कधी संपायच्या समजतच नव्हतं. जशा उन्हाळी सुट्ट्या संपल्या पुन्हा शाळा सुरू झाल्यानंतर त्या उन्हाळी सुट्ट्या कशा गेल्या, यावर आमच्यात सप्ताहाच्या सप्ताह चर्चा असायच्या. १ मे च्या आठवणी, निकालाची प्रतीक्षा आणि बरंच काही.. सायंकाळी झोपताना संपूर्ण आठवणींचा चित्रपट डोळ्यासमोर साकार झाला. पुन्हा मिळतील का ते दिवस ? ... जुन्या आठवणींना मोडखळ शब्दात उजाळा..!

सरते शेवटी, जगद्गुरू संत तुकोबांच्या अभंगाची ओवीने समारोप घ्यावासा वाटतो...

**लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ।।**
**ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ।।**
**ज्याचे अंगी मोठेपणा । तया यातना कठीण।।**
**तुका म्हणे जाण । व्हावे लहानाहूनि लहान ।।**

**- डॉ. नरेश बोधनकर, कुंडलवाडी**

# नात्यातील गोडवा नका होऊ देऊ कडवा...

आजकालच्या माणसांमध्ये स्वार्थ खूप बोकाळला आहे. स्वार्थापायी नात्यातील गोडवा व आपुलकी दिवसेंदिवस कमी होऊन रक्ताची नाती तटातट तुटत आहेत. नात्यांमध्ये दुरावा निर्माण होऊन नाते अक्राळ विक्राळ रूप धारण करत आहेत. स्वार्थ साधण्यासाठी माणूस कोणत्याही थराला जाऊन वाट्टेल ते कृत्य करत आहे. पैशासाठी जवळच्या नात्याला पायदळी तुडवून खोट्या नात्याला जवळ करत आहे. स्वतःच्या आई-वडिलांना अंतर देऊन बायकोच्या आई-वडिलांना जवळ करत आहे. म्हणजे आजकालची दुनिया खऱ्या नात्याला विसरून खोट्या नात्यात रममान झाली आहे. स्वार्थापायी शेतीच्या व घराच्या वाटणीवरून भावाभावांत वैर निर्माण होत आहे. आणि हे वैर विकोपाला जाऊन सख्खे भाऊ पक्के वैरी बनून एकमेकांचा काटा काढण्यासाठी एकमेकांवर टपले आहेत. आई वडील शेती व घर नावावर करत नाहीत म्हणून आई-वडिलांना घराबाहेर काढले जात आहे. अथवा त्यांना ठार मारले जात आहे.

अशी भयानक परिस्थिती सध्या देशात निर्माण झाली आहे. बहिण शेतीची व घराची वाटणी मागत आहे, म्हणून बहिणी सोबत अबोला धरला जात आहे. वेळेवर पैशाची परतफेड न केल्यामुळे देखील नात्यांमध्ये कटूता निर्माण होत आहे. भावाने मुलाला मुलगी न दिल्यामुळे बहिण भावावर नाराज होत आहे. अथवा भाऊ बहिणीवर नाराज होत आहे. एखाद्या कार्यक्रमाला वा लग्नाला न आमंत्रित केल्यामुळे देखील नात्यांमध्ये द्वेष निर्माण होत आहे. घरातील सदस्य आजारी पडल्यावर नातेवाईक बघायला न आल्यामुळे देखील नात्यात कडवटपणा निर्माण होत आहे. तसेच घरातील सदस्य मृत्यू पावल्यावर अंत्यविधीला न आल्यामुळे देखील नातेवाईकांमध्ये कमालीची कटुता निर्माण होत आहे. आणि नातेवाईक एकमेकांचे तोंड देखील बघायला तयार होत नाहीत. अशा लहान सहान कारणांमुळे नात्यांमधील मायेचा ओलावा आटून नात्यात दुरावा निर्माण होत आहे. आणि रक्ताची नाती तटातट तुटत आहेत. खरेतर आजकाल नाती तुटायला पैसा व श्रीमंती कारणीभूत आहे. एखाद्या व्यक्ती जवळ भरपूर संपत्ती व पैसा आला की, तो व्यक्ती स्वतःला श्रेष्ठ समजायला लागतो. माणूस अहंकारी व गर्विष्ठ बनून इतरांना तुच्छ समजायला लागतो. त्याला वाटते की, लोकांनी मला स्वतःहून बोलावे, माझ्या मागे पुढे फिरावे आणि माझ्या श्रीमंतीचे गोडवे गावे, असे त्यांना मनोमन वाटते. म्हणून ते स्वतःला जरा वेगळेच समजतात. अशा गर्विष्ठ, अहंकारी व पैशाचा माज चढलेल्या लोकांना नात्याची जराही किंमत व कदर नसते. म्हणूनच आजकाल पैशापुढे नाते टिकणे अशक्य झाले आहे. जोपर्यंत माणसाजवळ पैसा व संपत्ती आहे, तोपर्यंत माणूस नात्याला विसरून जात आहे. आणि मग एकदा पैशाची नशा उतरली की, माणूस बरोबर रुळावर येऊन नात्याला जिवापाड जपायला लागतो. नात्याला महत्त्व द्यायला लागतो.

सगळ्यात नाजूक नाते हे प्रेमाचे असते म्हणजेच पती-पत्नीचे असते. आणि या पती-पत्नीच्या नाजूक नात्यात शंकेची पाल चुकचुकली की, संसाराचं घरटं मोडायला आणि जीवनाचं वाळवंट व्हायला वेळ लागत नाही. म्हणून पती-पत्नीने एकमेकांना समजून घेतले पाहिजे. एकमेकांवर विश्वास ठेवला पाहिजे. म्हणजे नात्यात आपोआप गोडवा निर्माण होऊन नाते अधिक घट्ट व्हायला लागते.

म्हणून कोणत्याही नात्यात विश्वास खूप महत्त्वाचा असतो. पती-पत्नीचे नाते, बहिण भावाचे नाते, बाप लेकाचे नाते, मामा भाच्याचे नाते आणि शिक्षक विद्यार्थ्यांचे नाते हे पूर्णपणे विश्वासावर अवलंबून असते. या नात्यात जोपर्यंत विश्वासाला तडा जात नाही तोपर्यंत हे नाते कोणाच्या बापालाही तोडता येत नाही. हे नाते कायम आनंदाने नांदत राहते. फक्त गरज आहे ती एकमेकांना समजून घेऊन एकमेकांवर विश्वास ठेवण्याची. आणि नात्याला जिवापाड जपण्याची.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई या दोघांचा एकमेकांवर खूप विश्वास होता. एकमेकांवर जीवापाड प्रेम होते. म्हणून या दोघांच्या नात्यात कधीच शंकेची पाल चुकचुकली नाही. शेवटपर्यंत माता रमाईने डॉ.बाबासाहेबांना तोलामोलाची साथ दिली. आणि डॉ.बाबासाहेबांनी देखील पत्नी रमाईवर विश्वास ठेवून उच्च शिक्षणाचा पर्वत लीलया सर केला. म्हणून या दोघांचा संसार यशस्वीपणे पार पडला. पण आजकाल पती-पत्नीचे नाते अनैतिक संबंधातून तटातट तुटून सुखी संसाराचे वाटोळे होत आहे. पती-पत्नीच्या घटस्फोटाच्या कित्येक केस कोर्टात दाखल आहेत. याला कारणीभूत दोघेही पती-पत्नी आहेत. पत्नी पर पुरुषासोबत अनैतिक संबंध ठेवते तर पती पर स्त्री सोबत अनैतिक संबंध ठेवतो. आणि जेव्हा या दोघांचे अनैतिक संबंध उघडे पडतात तेव्हा मात्र यांचा संसार उध्वस्त होऊन जीवनाचे वाळवंट होऊन जाते.

म्हणून आजकालच्या महिलांनी व पुरुषांनी छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच सावित्रीबाई फुले, माता रमाई , माता जिजाऊ व माता भिमाई या महापुरुषांचा व महामातांचा आदर्श घेऊन आपल्या संसारात सुखाची व आनंदाची मंगलमय पहाट आणावी. म्हणजे आपल्या नात्यातील गोडवा कधीच होणार नाही कडवा...हे लक्षात ठेवा.

छत्रपती शिवरायांसमोर काळ्या रात्री मुस्लिम समाजाची एक सुंदर तरुणी आली होती. आणि ती छत्रपती शिवरायांवर प्रेम करत होती. पण छत्रपती शिवरायांनी त्या सुंदर तरुणीला आईची उपमा दिली होती. शत्रूच्या ही स्त्रीला मातेसमान मानणारा राजा पुन्हा होणे नाही...

डॉ.बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला असताना, बाबासाहेबांची विद्वत्ता व टॅलेंट पाहून एका सुंदर तरुणीने बाबासाहेबांना प्रपोज केला होता. तेव्हा बाबासाहेब म्हणाले बरं झालं मला एक बहीण मिळाली.बाबासाहेबांचे माता रमाईवर जीवापाड प्रेम होते. म्हणून त्या तरुणीला डॉ.बाबासाहेबांनी बहिणीची उपमा दिली. म्हणून यांच्या संसारात कधीच वाईटपणा आला नाही...

कारण तेव्हाची संस्कृतीच तशी सुसंस्कारी व चारित्र्यसंपन्न होती. एकमेकांवर मनापासून विश्वास ठेवणारी होती. तेव्हा विश्वास या शब्दाला खूप महत्त्व होते. प्रत्येक जण आपापले नाते प्रामाणिकपणे निभावण्यात व्यस्त होते. तेव्हाच्या लोकांनी नात्यातील गोडवा कधीच होऊ दिला नाही कडवा. तेव्हाच्या महिला देखील आपल्या शिलाला व चारित्र्याला जीवापाड जपायच्या. आपल्या पतीला देवा समान मानून त्याची पूजा करायच्या. तेव्हा पती-पत्नीच्या नात्यात, बापलेकाच्या नात्यात, बहिण भावाच्या नात्यात, मामा भाच्याच्या नात्यात व मित्र-मैत्रिणीच्या नात्यात एक प्रेमाची व मायेची अतुट नाळ जोडलेली होती. म्हणून यांचा एकमेकांवर अफाट विश्वास होता. म्हणून यांच्या नात्यात कधीच दुरावा निर्माण झाला नाही की, कडवटपणा आला नाही. आणि शंकेची पाल देखील चुकचुकली नाही. ही तत्कालीन वस्तुस्थिती कोणालाही नाकारता येणार नाही. आपणही तत्कालीन महापुरुषांचा, महामातांचा व स्त्री-पुरुषांचा आदर्श घेऊन नात्याची जोडलेली नाळ अधिक घट्ट करावी...

म्हणजे आपल्या नात्यात कधीच दुरावा निर्माण होणार नाही. आणि नात्यातील गोडवा कधीच कडवा होणार नाही...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जि.लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# महाबळेश्वर येथे आयोजित महापर्यटन उत्सव-२०२५ चा शानदार समारोप

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०५, महाबळेश्वर (सातारा) :** महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ द्वारा महाबळेश्वर येथे आयोजित 'महापर्यटन उत्सव-२०२५' चा शानदार समारोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झाला. पर्यटन विकासासाठी पर्यटन विभागाने वर्षाभारतील पर्यटनाचे वेळापत्रक तयार करून त्यात राज्याच्या विविध भागात वर्षभरात आयोजित उत्सव सोहळ्यांचा समावेश करावा. यासोबतच देशातील टूर ऑपरेटर्स सोबत कार्यशाळा घेऊन त्यांना इथल्या पर्यटन सुविधांची माहिती द्यावी. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून एकाच पोर्टलवर सर्व पर्यटन सुविधांची माहिती द्यावी, असे प्रतिपादन यावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केले. कार्यक्रमाला विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, उद्योग मंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, ग्राम विकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव (पाटील), आ.डॉ.अतुल भोसले, आ.सचिन पाटील, आदी उपस्थित होते.

पर्यटन महोत्सवला उत्तम प्रतिसाद मिळाल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन करून मुख्यमंत्री म्हणाले, पर्यटन वाढीसाठी नागरी सुविधा आणि पर्यटन संस्कृती विकसित करणे गरजेचे आहे. पर्यटन संस्कृती विकसित करुन स्थानिकांचे सहकार्य

पर्यटकांना सुखद अनुभव येण्यासाठी महत्वाचे आहे. शौर्य आणि निसर्ग सौंदर्याचा सुंदर मिलाफ महाबळेश्वर येथे पाहायला मिळतो. निसर्गाने सुंदर पश्चिम घाट आपल्याला दिला आहे, ७२० किलोमीटरचा समुद्रकिनारा दिला आहे, अनेक सुंदर पवित्र तीर्थक्षेत्रे आपल्याकडे आहेत, हे सौंदर्य देश परदेशात पोहोचविण्याचे काम आपल्याला करायचे आहे आणि हा महोत्सव त्यादृष्टीने महत्वाचा आहे.

**पर्यटनामुळे रोजगार निर्मितीला चालना -**

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, उद्योग



क्षेत्रात मोठी गुंतवणूक आल्यावर रोजगार निर्माण होतात, मात्र पर्यटन क्षेत्रात कमी गुंतवणूकीत अधिक रोजगार निर्माण होतात. मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करण्याची क्षमता या व्यवसायात आहे. पर्यटन क्षेत्रात पाचव्या क्रमांकावरून पहिल्या क्रमांकावर येण्याची क्षमता महाराष्ट्रात आहे. राज्याला पर्यटन क्षेत्रात पहिल्या क्रमांकावर आणण्याचे कार्य पुढील ५ वर्षात करण्यात येईल.

**महाबळेश्वर हे देशातील उत्तम पर्यटनस्थळ -**

महाबळेश्वर हे देशातील सर्वोत्तम पर्यटनस्थळ असून त्याचे मोठ्या प्रमाणात मार्केटिंग करण्याची गरज आहे. महाबळेश्वर हे नवे गिरीस्थान म्हणून विकसित करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. . पुढचा पर्यटन महोत्सव कोयनेच्या बॅक वॉटर परिसरात घेऊन तेथील संस्कृतीचा पर्यटकांना परिचय करून देण्यात येईल, असे श्री. फडणवीस म्हणाले. पर्यटनाच्या क्षेत्रातील स्कुबा डायव्हिंगसारख्या नव्या कल्पना पुढे आणून राज्यातील पर्यटनाला चालना देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. कोयना बॅकवॉटर संबंधी असणारी बंधने दूर केल्याने तेथे चांगली पर्यटन व्यवस्था उभी राहत आहे. पुढील महापर्यटन उत्सव कोयना बॅकवॉटर क्षेत्रात घेण्यात येईल व पर्यटकांना या भागातील निसर्ग सौंदर्याचा आणि जल क्रीडांचा अनुभव घडविण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

मुंबई येथे आयोजित वेव्हज परिषदेमुळे क्रिएटर्स इकॉनॉमिमध्ये महाराष्ट्र महत्वाची भूमिका अदा करेल, असा विश्वास व्यक्त करताना आपल्या सांस्कृतिक विविधता कंटेन्ट क्रिएटर्सच्या माध्यमातून जगभरात पोहोचण्याचे प्रयत्न व्हावेत. पर्यटकाला स्थानिक वैशिष्ट्याचा परिचय करून दिल्यास पर्यटक त्यांच्या भागाकडे वळेल आणि पर्यटनाला चालना मिळेल, असा विश्वास श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, महाबळेश्वर निसर्गाने समृद्ध असून पर्यटनाची अमर्याद क्षमता इथे आहे. मुनावळे येथे जलपर्यटनालाही चांगला प्रतिसाद मिळतो आहे. पर्यटकांना इथल्या निसर्गासोबत इथल्या कला, संस्कृती, इतिहास आणि खाद्यपदार्थांचा आनंद घेता येईल. इथल्या भूमीपुत्राला पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध होईल आणि आपल्या कुटुंबासोबत भूमातेची सेवा करण्याची संधी मिळेल. तीन दिवसात महोत्सवला पर्यटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पर्यटन महोत्सवाच्या माध्यमातून इथल्या पर्यटनाला चालना मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राज्य शासनाने लोकाभिमुख योजनांना चालना देण्यासोबत गड किल्ले संवर्धनाला चालना देण्याचे कार्य केले. पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी देखील प्रयत्न होत आहेत. भिलार येथे पुस्तकांचे गाव, मांघर येथे मधाचे गाव आहे. इथे सर्वोत्तम स्ट्रॉबेरी उत्पादन होते.

वेण्णा लेकचे सौंदर्य आहे, लोकसंस्कृतीचे विविध रंग आहेत. हे सर्व एकच ठिकाणी आणण्याचे काम महापर्यटन उत्सवाच्या माध्यमातून झाले आहे. अत्यंत नेटके नियोजन आणि सुरक्षित पर्यटन यामुळे हा महापर्यटन उत्सव वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. महाबळेश्वरला नवे आणि सुंदर पर्यटनस्थळ म्हणून विकसित कारण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.विधान परिषदेचे सभापती प्रा.शिंदे म्हणाले, महाबळेश्वर हे पर्यटकांच्या आवडीचे ठिकाण आहे. महापर्यटन उत्सवाला पर्यटकांचा चांगला प्रतिसाद लाभल्याने महोत्सवाचा विस्तार करून पुढल्यावर्षी अधिक पर्यटक येतील याचा प्रयत्न व्हावा. पर्यटन क्षेत्रातील अभिनव कल्पना या महोत्सवात पाहायला मिळाल्या. परदेशातील पर्यटनाच्या उत्तम संकल्पनादेखील पर्यटन विभागाने स्वीकाराव्यात अशी सूचना त्यांनी केली.

प्रस्ताविकात पर्यटनमंत्री शंभुराज देसाई म्हणाले, महापर्यटन उत्सवाचा हा पहिलाच प्रयत्न होता. महोत्सवाला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता राज्यातील प्रत्येक विभागात दरवर्षी पर्यटन महोत्सव घेण्यात येईल. या माध्यमातून त्या विभागातील पर्यटनस्थळे, वैशिष्ट्ये याचे ब्रँडिंग करण्यात येईल. पर्यटन विकासाला मोठी संधी आहे. मुनावळे येथील पर्यटन सुविधांच्या माध्यमातून पर्यटकांना आकर्षित करण्यात यश येईल. कोयनेच्या बॅक वॉटरमध्ये पर्यटन विकासाचा आराखडा तयार करून पर्यटकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

तीन दिवसाच्या महापर्यटन महोत्सवात ७५ हजार पेक्षा अधिक पर्यटकांनी सहभाग घेतला. शिवकालीन शास्त्र, छायाचित्र प्रदर्शन, खाद्य जत्रा, महाराष्ट्राचा बाज असलेले कार्नीव्हल परेड, लेझर आणि ड्रोन शो, हेलिकॉप्टर राईड, किल्ले आणि शस्त्रास्त्र प्रदर्शन, खाद्य जत्रा, लेझर आणि ड्रोन शो, लोककला अशा विविध उपक्रमांना पर्यटकांचा प्रतिसाद मिळाल्याचे त्यांनी सांगितले. महोत्सवासाठी स्थानिकांचे चांगले सहकार्य मिळाल्याचेही श्री. देसाई म्हणाले. यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जपानचे कौन्सीलेट जनरल यमाशीता सान, व्यवस्थापकीय संचालक मनोजकुमार सुर्यवंशी, संचालक डॉ.बी.एन.पाटील, जिल्हाधिकारी संतोष पाटील, पर्यटन महोत्सवाच्या ब्रँड ॲम्बेसेडर मृणाल कुलकर्णी, नवेली देशमुख, समन्वय समिती सदस्य आदी उपस्थित होते.

# शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ७५.३५ टक्के

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** बारावी परीक्षेचा निकाल सोमवार, दिनांक ०५ मे २०२५ रोजी जाहीर झाला. सत्र २०२४-२५ या शैक्षणिक सत्रात शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय खापरखेडा येथील बाराव्या वर्गाच्या परीक्षेला एकूण १४२ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १०७ विद्यार्थ्यांनी यशस्वी झाले असून शाळेचा निकाल ७५.३५ टक्के लागला आहे. कला शाखेत रिंकू इंगोले याने प्रथम क्रमांक मिळविला त्याला ७२.५० टक्के गुण मिळाले तर रितु रायमल हिला द्वितीय क्रमांक मिळाला तिला ६६.१७ टक्के गुण मिळाले. तसेच वाणिज्य शाखेतून आदित्य चंदेल याने प्रथम क्रमांक मिळविला असून त्याला ७५.३० टक्के गुण मिळाले आहे.

द्वितीय क्रमांक नेहा भास्कर हिने मिळविला असून तिने ६२.५० टक्के मिळविले आहे असून प्रशासक निखिल भुयार, मुख्याध्यापक विमालप्रकाश मिश्रा, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून भविष्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

**महाराष्ट्र विद्यालयाचा विज्ञान विषयाच्या निकाल ९९.५५ टक्के**

एच. एस. सी. बोर्डाचा निकाल जाहीर झाला असून स्थानिक महाराष्ट्र कनिष्ठ महाविद्यालय खापरखेडा येथील इयत्ता बारावी बोर्डाच्या परीक्षेचा विज्ञान शाखेचा निकाल ९९.५५ टक्के तर कला शाखेचा निकाल ८९.२५ टक्के इतका लागला असून महाविद्यालयातून विज्ञान शाखेत चि. हर्षीद धीरज शेंडे ७७ टक्के प्रथम कु. रितू राजू मेश्राम ७५.६७ टक्के द्वितीय तर कु. साक्षी गजानन शिदुरकर



हीला ७३.१७ टक्के इतके गुण प्राप्त होऊन तृतीय क्रमांक प्राप्त केला. कला शाखेमधून महाविद्यालयातून कु. नंदिनी विनोद लोखंडे ५८.३३% प्रथम कु. वैष्णवी प्रकाश महल्ले ५७.५० टक्के द्वितीय तर कु. कावेरी उमेश ठाकरे ५५.१७% गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक प्राप्त केला. प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री सुनील केदार संस्थेच्या सचिव सुहास केदार यांनी अभिनंदन केले.

तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचे महाविद्यालयांचे प्राचार्य अरुण वडस्कर उपप्राचार्य चंद्रशेखर लिखार कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा.विजय टेकाडे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा.दिगंबर आडे, प्रा.संगीता चव्हाण, प्रा.सुषमा वानखेडे, प्रा.श्वेता रोकडे, प्रा.सुजित सायरे, प्रा.अनिल जाधव, प्रा.पापिता नेहारे, प्रा.अर्चना बोरकर, दीप्ती कुरडकर, कु.प्रियंका लुटे, कु.सरला वरकडे उपस्थित होते.

# बोगस बियाणे, खत लिकेंजसारख्या प्रकारांना तात्काळ आळा घाला - आमदार सावरकर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, अकोला :** बोगस बियाण्यांची कुठेही विक्री होता कामा नये. त्याचप्रमाणे, रासायनिक खतासोबत इतर उत्पादनांचे लिंकेजही कुठे होऊ नये. या संदर्भातील तक्रारींचे तत्काळ निवारण करावे, असे निर्देश आमदार रणधीर सावरकर यांनी दिले.

अकोला तालुका स्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक आमदार रणधीर सावरकर यांच्या अध्यक्षतेत नियोजनभवनात सोमवार, दिनांक ०५ मे २०२५ रोजी झाली. त्यावेळी ते बोलत होते. आमदार अमोल मिटकरी, कृषी विभागाचे विविध अधिकारी, स्थानिक प्रशासन आणि शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते. बोगस बियाण्यांची विक्री, खतांचे लिंकेज,




शेतकऱ्यांचे नुकसान, नवीन तंत्रज्ञानाचा वापर आदी विषयांवर सखोल चर्चा झाली.

आमदार श्री. सावरकर म्हणाले की, कृषी निविष्ठांचा साठा व पुरवठ्याबाबत सजग राहून संनियंत्रण करावे. शेतकरी बांधवांची कुठेही फसवणूक होता कामा नये. घरगुती बियाण्याचा वापर वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याची सूचनाही त्यांनी केली. तालुकास्तरावर ई-केवायसी शिबिरे आयोजित करावी. जेणेकरून प्रधानमंत्री किसान सन्मान निधीच्या लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना फायदा मिळेल. 'ॲग्रीस्टॅक' पोर्टलवरील नोंदणीबाबत सर्वदूर जनजागृती करावी. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेत ३५ टक्के अनुदान देण्यात येते. अधिकाधिक शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळवून द्यावा, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

बियाणे, खते यांची साठेबाजी टाळावी. पीक नुकसानीचे सर्वेक्षण तत्काळ व्हावे. पीक विमा योजनेत खरबुजाचे उत्पादन समाविष्ट करावे, बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागते. त्यामुळे संपूर्ण बियाण्यांच्या मागणीच्या १० टक्के साठा जास्तीचा राखीव ठेवण्यात यावा. रेशीम शेती वाढवण्यासाठी कार्यशाळा घेण्यात याव्यात. असे निर्देश आमदार श्री. मिटकरी यांनी दिले. लिंबू, संत्रा, हळद, तीळ आणि भाजीपाला आदी पीकांचे चांगले उत्पादन घेणा-या शेतकरी बांधवांचा यावेळी सत्कार करण्यात आला. किसान सन्मान निधी योजनेंतर्गत पत्रकांचे वाटप करण्यात आले. गुणवंत कृषी कर्मचाऱ्यांना ही यावेळी गौरविण्यात आले.

## थोडक्यात

### राजेंद्र उच्च माध्यमिक महाविद्यालयाची उज्वल निकालाची परंपरा कायम

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०५, खंडाळा (सातारा) :** उज्वल निकालाची आपली परंपरा कायम राखत खंडाळा विभाग शिक्षण समिती खंडाळच्या राजेंद्र विद्यालय व उच्च महाविद्यालय खंडाळा फेब्रुवारी २०२५ एच.एस.सी. बोर्ड परीक्षेचा निकाल सोमवार, दिनांक ०५ मे २०२५ रोजी जाहीर करण्यात आला. यामध्ये राजेंद्र महाविद्यालय विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत राजेंद्र महाविद्यालयाची उज्वल निकाल, यशाची परंपरा जोपसल्याचे दिसत आहे. कला शाखेच्या कु.गाढवे सुमेधा गणेशने सर्वाधिक ९३.८३ टक्के गुण मिळवत कला विभाग तसेच महाविद्यालयात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला आहे. राजेंद्र महविद्यालयातून फेब्रुवारी २०२५ एच. एस. सी. बोर्ड परीक्षेला कला शाखेतील परीक्षेला बसलेले एकूण ५८विद्यार्थ्यांपैकी ४७ विद्यर्थी उत्तीर्ण तर ११ अनुत्तीर्ण झाले आहेत.वाणिज्य विभागातून एच.एस.सी. बोर्ड परीक्षेसाठी बसलेल्या एकूण १०८ विद्यार्थ्यांपैकी १०५ विद्यार्थी उत्तीर्ण तर फक्त ३ विद्यार्थी अनुउत्तीर्ण झाले आहेत. कु.आदिष्ठ नम्रता नारायण हिने ८६.६७ टक्के गुण मिळवत वाणिज्य विभागातून प्रथम येण्याचा बहुमान मिळवला आहे. तसेच सर्वाधिक विद्यार्थी संख्या असलेल्या शास्त्र विभागतून ३८९ विद्यार्थी या बोर्ड परीक्षेला बसलेले होते. पैकी ३८२ विध्यार्थी उत्तीर्ण तर ७ विध्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत. शास्त्र विभागात कु.धायगुडे श्रद्धा राजेंद्र ७९.३३ टक्के गुण मिळवत प्रथम आलेली आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्याचे खंडाळा विभाग शिक्षण समिती व राजेंद्र महाविद्यालय खंडाळा सर्व शिक्षक व कर्मचारी वृंद यांचेकडून अभिनंदन करण्यात आले तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

### शासकीय सेवा ऑनलाईन देऊन नागरिकांचे जीवन सुखकर करा - संचालक काटकर



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, सातारा :** शासनाकडून देण्यात येणाऱ्या सेवा नागरिकांपर्यत जलद पोहोचवून नागरीकांचे जीवन सुखकर बनविण्यासाठी ऑनलाईन सेवा देण्याचे धोरण अवलंबिले आहे. यासाठी सर्व सेवा ऑनलाईन देऊन नागरिकांचे जीवन सुखकर करा, असे आवाहन महा आयटी कॉर्पोरेशन मुंबई चे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात सातारा जिल्ह्यातील सर्व शासकीय विभाग प्रमुखांसोबत राईट टू सर्व्हीस अंमलबजावणी आणि ऑनलाईन सेवा पुरविणाऱ्या केंद्र चालकांच्या क्षेत्रीय कामकाजाबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस उपजिल्हाधिकारी (महसूल) विक्रांत चव्हाण, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) अर्चना वाघमळे, जिल्हा उपनिबंधक संजयकुमार सुद्रीक, पाटणचे प्रांताधिकारी सोपान टोम्पे, जावळी (मेढा) तहसीलदार श्री. कोळेकर आदी उपस्थित होते. शासनाकडील सेवा मिळवणे हा नागरीकांचा अधिकार झाला असून त्या सेवा अधिसुचित होऊन लवकर मिळण्यासाठी ऑनलाईन उपलब्ध झाल्या पाहिजेत हा शासनाचा मानस आहे, असे सांगून श्री. काटकर म्हणाले, शासनाने १५ ऑगस्ट पर्यंत जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन करण्याचे निर्देश दिले आहेत, नागरिकांच्या समस्या सोडवू शकलो तरच नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी पारदर्शी, सकारात्मक वातावरण होईल. ऑनलाईन सेवा देताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी वापरण्यात येणारे तंत्रज्ञान अद्ययावत करण्यात येणार आहे. इंटरनेटसह पायाभूत सूविधा देण्यात येणार आहे. क्षमता बांधणीसाठी शासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच सेवाकेंद्राच्या कर्मचाऱ्यांना उपयोगी असे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी शासनाने तरतूद ही केली आहे, असेही ते म्हणाले. या बैठकीत शासकीय कार्यालय प्रमुखांसह, शासनाच्या विविध ऑनलाईन सेवा पुरविणाऱ्या केंद्रचालक यांनी ऑनलाईन सेवेतील येणाऱ्या अडचणी मांडल्या.

### नवी मुंबई महापालिका लोकशाही दिन २ जून रोजी

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०५, नवी मुंबई :** महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. माहे मे महिन्याच्या लोकशाही दिनामध्ये प्राप्त २ अर्जांपैकी आरोग्य विभागाशी निगडीत १ अर्जदाराच्या निवेदनावर आधीच कार्यवाही झाल्याने त्यांच्यामार्फत अर्ज मागे घेण्यात आला. तसेच मालमत्ताकर विभागाशी संबंधित १ अर्जाची सुनावणी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी घेतली. माहे जून महिन्याचा लोकशाही दिन दि.२ जून २०२५ रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये दि.१९ मे २०२५ पर्यंत मा.आयुक्त, नवी मुंबई महानगर पालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे. लोकशाही दिनाकरीता करावयाच्या अर्जाचा विहित नमुना नवी मुंबई महानगरपालिकेच्य www.nmmc.gov.in या संकेतस्थळाच्या (वेबसाईट) मुख्यपृष्ठावर जलद दुवे (क्विक लिंक्स) आयकॉनवर उपलब्ध असून ती अर्ज नमुना प्रत सहजपणे डाऊनलोड करुन घेता येऊ शकते. त्याचप्रमाणे महानगरपालिका नूतन मुख्यालय इमारत, जनसंपर्क विभाग, तिसरा मजला, सेक्टर १५ए, किल्ले गांवठाण जवळ, सी.बी.डी., बेलापूर येथेही प्रत नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध आहे.अर्ज करताना नागरिकांनी शासन निर्णयानुसार अर्जात नमूद तक्रार / निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे याची दखल घ्यावयाची आहे. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा. अर्जदाराने संबंधित विषयाबाबत या आधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे. याशिवाय लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/ अपिल, सेवाविषयक- आस्थापना विषयकबाबी याबाबतचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावयाची आहे. विहित नमुन्यात नसणारे व अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच तक्रार / निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे नसेल तर तसेच यापूर्वीच अंतिम उत्तर दिलेले आहे/ देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज ही स्विकारले जाणार नाहीत याचीही नागरिकांनी नोंद घ्यावी असे सूचित करण्यात येत आहे.